टेनिसविश्वातील नव्या द्वंद्वाची नांदी!

ऐतिहासिक लढतीत सिन्नेरला नमवत अल्कराझ सलग दुसऱ्यांदा 'फ्रेंच' विजेता

वृत्तसंस्था, पॅरिस

पाच सेटच्या लढतीत पहिले दोन सेट गमावल्यानंतर कधीही पुनरागमन न केल्याचा इतिहास, चौथ्या सेटमध्ये ३-५ अशी पिछाडी, त्यातही अग्रमानांकित प्रतिस्पर्ध्याकडे तीन 'चॅम्पियनशिप' गुणांची संधी...अशा प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता, हार न मानता बाजी पूर्णपणे पलटवण्याची करामत स्पेनच्या कार्लोस अल्कराझने केली. जवळपास साडेपाच तास आणि पाच अविस्मरणीय सेटच्या ऐतिहासिक झुंजीत इटलीच्या यानिक सिन्नेरचे आव्हान परतवून लावताना अल्कराझने फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेचे जेतेपद राखण्याची किमया साधली.

रॉजर फेडरर, राफेल नदाल आणि नोव्हाक जोकोविच या प्रथितयश त्रिकुटाने गेली दोन दशके टेनिसविश्वावर वर्चस्व गाजवले. त्यांनी या खेळाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. मात्र, फेडरर आणि नदालची निवृत्ती, तसेच जोकोविच आता कारकीर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर असल्याने टेनिसच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. परंतु अल्कराझ आणि सिन्नेर यांचा फ्रेंच स्पर्धेच्या अंतिम लढतीतील खेळ पाहून जाणकार व चाहत्यांना नक्कीच मोठा दिलासा मिळाला. टेनिसच्या नव्या पर्वाची, नव्या द्वंद्वाची ही नांदी ठरली. अल्कराझने लढत ४-६, ६-७ (४-७), ६-४, ७-६ (७-३), ७-६ (१०-२) अशी जिंकली.

''सिन्नेरविरुद्ध मी प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम लढतीत खेळलो. मात्र, ही केवळ सुरुवात आहे. आम्ही यापुढे अनेकदा एकमेकांसमोर येऊ अशी आशा आहे. सिन्नेर खूपच उच्च दर्जाचा खेळाडू आहे. त्याच्याविरुद्ध खेळताना कामगिरी उंचावण्याची आपोआपच प्रेरणा मिळते. ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकण्यासाठी तुम्हाला सर्वोत्तम खेळाडूंनाच पराभूत करावे लागते. आज मी हे करू शकलो याचा आनंद आहे,'' अशी प्रतिक्रिया अंतिम लढतीनंतर अल्कराझने व्यक्त केली.

फ्रेंच स्पर्धेची अंतिम लढत अनेक कारणांनी महत्त्वाची ठरली. २२ वर्षीय अल्कराझ विरुद्ध २३ वर्षीय सिन्नेर हा टेनिसच्या नव्या युगातील सर्वांत लक्षवेधी सामना ठरणार असे मत जाणकार व्यक्त करतात. हे तुल्यबळ खेळाडू ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम लढतीत प्रथमच एकमेकांविरुद्ध खेळले. याआधी ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत अल्कराझने चारपैकी चार, तर सिन्नेरने तीनपैकी तीन लढती जिंकल्या होत्या. त्यामुळे एका खेळाडूची विजयमालिका खंडित होणार हे निश्चित होते. सिन्नेर सलग तिसऱ्या ग्रँडस्लॅम, तर अल्कराझ सलग दुसऱ्या फ्रेंच जेतेपदाच्या प्रयत्नात होता. त्यामुळे हे दोघे सर्वस्व पणाला लावून खेळणार हे अपेक्षित होते. तसेच झालेही. या दोघांनी लढवय्या वृत्तीचे दर्शन घडवताना चाहत्यांना कायम लक्षात राहील अशी अंतिम लढत दिली. तब्बल ५ तास आणि २९ मिनिटांच्या झुंजीनंतर अल्कराझने लढत जिंकली. मात्र, त्यानंतर फेडररने दिलेली प्रतिक्रिया सर्वांत बोलकी होती. 'आज कोणीही हरले नाही, उलट तीन विजेते होते. अल्कराझ, सिन्नेर आणि टेनिस.' या सर्वांगसुंदर खेळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचे संकेतच या लढतीतून मिळाले.

५:२९ सिन्नेर आणि अल्कराझ यांच्यातील लढत तब्बल पाच तास आणि २९ मिनिटे चालली. फ्रेंच स्पर्धेची ही सर्वांत प्रदीर्घ अंतिम लढत ठरली. याआधी १९८२ मध्ये मॅट्स विलँडर आणि गुलेरमो विलास यांच्यातील अंतिम लढत चार तास आणि ४२ मिनिटे रंगली होती. त्यावेळी विलँडर विजेता ठरला होता.

५ अल्कराझचे हे पाचवे ग्रँडस्लॅम जेतेपद ठरले. विशेष म्हणजे ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम लढतीत तो कधीही पराभूत झालेला नाही. कारकीर्दीच्या सुरुवातीला पाच किंवा त्याहून अधिक ग्रँडस्लॅम अंतिम लढती जिंकणारा तो फेडररनंतरचा दुसरा टेनिसपटू ठरला. फेडररने सलग सात अंतिम लढती जिंकल्या होत्या.

माझ्या कारकीर्दीतील ही सर्वांत रोमहर्षक लढत होती असे म्हणायला हरकत नाही. या लढतीत सर्व काही घडले. मला कसा जिंकलो आणि त्यानंतरच्या माझ्या भावना शब्दांत मांडणे अवघड आहे. विश्वातील अव्वल टेनिसपटूविरुद्ध दोन सेटची पिछाडी भरून काढणे जवळपास अशक्यच आहे. मात्र, मी कधीही विश्वास गमावला नाही. अखेरपर्यंत लढा देण्याचे ठरवले. त्यामुळेच जिंकू शकलो. - **कार्लोस अल्कराझ**

सलग चौथ्या सत्रात तेजी

निफ्टी निर्देशांक २०२५ च्या उच्चांकी पातळीवर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: जागतिक बाजारपेठेतील तेजी आणि रिझर्व्ह बँकेने केलेल्या अर्धा टक्क्यांच्या आक्रमक व्याजदर कपातीनंतर गुंतवणूकदारांच्या दुणावलेल्या उत्साहामुळे सोमवारी सलग चौथ्या सत्रात सेन्सेक्स आणि निफ्टी हे प्रमुख निर्देशांक तेजी दाखवत बंद झाले.

प्रामुख्याने बँकांच्या समभागांत झालेल्या खरेदीमुळे मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २५६.२२ अंशांनी वाढून ८२,४४५.२१ वर बंद झाला. दिवसभरात तो ४८०.०१ अंशांनी उसळून ८२,६६९ वर पोहोचला होता. निफ्टी निर्देशांक १००.१५ अंशांनी वाढून २५,१०३.२ वर बंद झाला. या निर्देशांकाचा हा गत आठ महिन्यांतील अर्थात २०२५ सालातील उच्चांकी स्तर आहे.

खासगी बँका आणि सरकारी मालकीच्या बँकांमध्ये झालेल्या खरेदीने त्यात अनुक्रमे एक आणि दीड टक्क्यांची सरासरी वाढ दिसून आली. उत्साही वातावरणांत बाजारातील १३ प्रमुख क्षेत्रनिहाय निर्देशांपैकी, १२ क्षेत्रांचे निर्देशांक वधारले. व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्मॉल आणि मिड कॅप निर्देशांकात अनुक्रमे सुमारे १.६ टक्के आणि १.१ टक्के अशी सरस वाढ झाली. या सलग तेजीमुळे स्मॉल-कॅप निर्देशांकाने वर्षाच्या सुरुवातीच्या काळात गमावलेले परत कमावून, आता सकारात्मक वळण घेतले आहे.

अमेरिका आणि चीनमधील व्यापार चर्चेच्या नवीन फेरीबद्दलच्या आशावादाने बाजारातील तेजीच्या उत्साहाला खतपाणी घातले. या आधी शुक्रवारी रिझर्व्ह बँकेने अनपेक्षितपणे व्याजदरात अर्धा टक्क्यांच्या धडक कपातीचा निर्णय घेऊन, तेजीला रसद पुरविली आहे. रिझर्व्ह बँकेचा निर्णय आला त्या शुक्रवारच्या सत्रात सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकात जवळपास एका टक्क्यांची तेजी दिसून आली आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून निरंतरपणे बाजारातून खरेदी सुरू असून, शुक्रवारच्या सत्रातही त्यांची १,००९.७१ कोटी रुपयांची नक्त समभाग खरेदी राहिल्याचे उपलब्ध आकडेवारी दर्शविते.

भागधारक मालामाल!

मुंबई : देशातील सूचिबद्ध कंपन्यांनी गेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात दिलेल्या लाभांशामुळे भागधारकांना चांगलाच धनलाभ झाला आहे. कंपन्यांचा महसूल आणि नफ्यात कमी वाढ होऊनही त्यांनी विक्रमी लाभांश दिला असून, तो वार्षिक तुलनेत १०.८ टक्के वाढीसह, ५ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर गेला आहे.

देशातील सूचिबद्ध कंपन्यांनी गेल्या आर्थिक वर्षात १६ लाख कोटी रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा कमावला. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये तो १५.२१ लाख कोटी रुपये होता. गेल्या आर्थिक वर्षात त्यात ५.२ टक्के वाढ झाली आहे. याचवेळी कंपन्यांच्या एकत्रित विक्री महसुलात (बँकांच्या बाबतीत निव्वळ व्याजापोटी उत्पन्न - निम) ७.५ टक्के वाढ होऊन तो १६६.४ लाख कोटी रुपये झाला.

कॉसमॉस बँकेच्या सभागृहात 'सहकार पाठशाले'चे उद्घाटन

पुणे: नॅशनल अर्बन को-ऑपरेटीव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनयूसीएफडीसी) आणि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी सहकारी बँकांकरिता एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. 'सहकार पाठशाला' नावाच्या या उपक्रमाचे उद्घाटन

कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कोकरे, एनयूसीएफडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी पद्मभूषण बहादुरे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर उपक्रमातील पहिल्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन कॉसमॉस बँकेच्या मुख्य कार्यालयातील सहकार सभागृहात करण्यात आले होते. एनयूसीएफडी ही सहकारी बँकांसाठी स्थापन केलेली शिखर संस्था असून नागरी सहकारी बँकांसाठी अद्ययावत माहिती तंत्रज्ञान संबंधित सुविधा पुरवण्यासाठी तसेच विविध वरिष्ठ पदांवरील कुशल मनुष्यबळ तयार करण्याचे महत्वाचे काम 'सहकार पाठशाला' या उपक्रमातून हाती घेण्यात आले असून, देशपातळीवर अशा अनेक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे.

पोर्तुगालचे विक्रमी जेतेपद

नेशन्स लीगच्या अंतिम लढतीत 'शूटआऊट'मध्ये स्पेनवर मात

म्युनिक : पोर्तुगालने स्पेनचा कडवा प्रतिकार पेनल्टी शूटआऊटमध्ये मोडून काढताना 'युएफा' नेशन्स लीग फुटबॉलचे जेतेपद पटकावले. ही स्पर्धा दोन वेळा जिंकणारा पोर्तुगाल पहिलाच संघ ठरला. बरोबरी करणारा ख्रिस्तियानो रोनाल्डोचा गोल, शूटआऊटमधील खेळाडूंची अचूक कामगिरी आणि बचावपटू नुनो मेंडेसला स्पेनचा तारांकित आक्रमकपटू लामिन यमालला रोखण्यात आलेले यश पोर्तुगालसाठी निर्णायक ठरले.

अवघ्या स्पेनवासीयांचे डोळे रविवारी क्रीडाक्षेत्रातील आपल्या आवडत्या खेळाडूंच्या कामगिरीकडे लागले होते. पॅरिसमध्ये स्पेनच्या कार्लोस अल्कराझने फ्रेंच टेनिस स्पर्धेत अखेरच्या क्षणी विजेतेपद मिळवून चाहत्यांना जल्लोषाची संधी दिली. मात्र, नेशन्स लीग फुटबॉलमध्ये स्पेनच्या फुटबॉल संघाने त्यांना निराश केले. म्युनिक येथे झालेल्या या लढतीत उत्तरार्धात स्पेनला खेळ उंचावता आला नाही. त्यामुळे नियोजित वेळेतील २-२ अशा बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये स्पेनला पोर्तुगालकडून ३-५ असा पराभव पत्करावा लागला.

शूटआऊटमध्ये अनुभवी आघाडीपटू अल्वारो मोराटाने मारलेली चौथी किक पोर्तुगालचा गोलरक्षक डिओगो कोस्टाने शिताफीने अडवली आणि त्यानंतर रुबेन नेव्हेसने पोर्तुगालची पाचवी किक यशस्वी मारून संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. पोर्तुगालच्या पाचही खेळाडूंनी पेनल्टी अचूक मारल्या.

फुटबॉल संघाची हाँगकाँगशी गाठ

कोवलून (हाँगकाँग) : 'एएफसी' आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या भारतीय फुटबॉल संघाच्या क्षमतेची आज, बुधवारी कसोटी लागणार आहे. तिसऱ्या फेरीच्या पात्रता फेरीत त्यांची हाँगकाँगशी गाठ पडणार आहे. भारताची भिस्त पुन्हा सुनील छेत्रीवरच असेल.

पात्रता स्पर्धेत भारताला अद्याप विजय मिळवता आलेला नाही. त्यामुळे मुख्य स्पर्धेत खेळण्यासाठी भारताला हाँगकाँगविरुद्ध विजय आवश्यक असेल.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - ४-अ - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव- जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीनुसार सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय :- ९ वा मजला, अंतरीक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली -११०००१, फोन :- ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब :- www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : ई-१, ई-२ आणि ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना रकाना क्र. - ए मध्ये सूचित केलेले नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन कॉलम क्र -डी मध्ये गहाण/सुरक्षित धनकोकडे केली आहे, **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. - सी मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलांनुसार **'जसे आहे तिथे आहे, जे आहे तसे आहे'** आणि **'तेथे जे काही आहे या तत्त्वावर'** विक्री केली जाईल.

तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम - ८ (६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. ए यात दर्शवलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/गहाण ठेवणारे/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी, (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/गहाणदार (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/सुरक्षित धनकोची वेबसाइट म्हणजेच, www.pnbhousing.com** यावर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या.

कर्ज क्र., कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी)	ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी)	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आरपी) (ई)	इएमडी (आरपीच्या १०%) (एफ)	बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	तपासणीची तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार/न्यायालयीन प्रकरणे, जर असतील तर (के)
एचओयू/एआरएनजी/०१२२/९४८४१० ब्रिजेंद्र द्विवेदी/जयश्री तुकाराम काळे, बीओ: औरंगाबाद	रु. २२,३५,५१७.९६ आणि दि. १७.०६.२०२४	भौतिक	रो हाऊस क्र जी ८, गट क्र. १२९, फेज II, अक्षद सुपर सिटी, गंगापूर जहांगीर, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत, ४३१००१.	रु. १६,११,०००	रु. १,६१,१००	१४.०७.२०२५	रु. १०,०००	दि. १७.०६.२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वाजेपर्यंत	दि. १५.०७.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वाजेपर्यंत	*शून्य/ माहीत नाही

***आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @१८% दरसाल लागू आहे. ** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी आणि माहितीनुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात इतर कोणतेही दायित्व/दावे नाहीत, जे कॉलम क्र.- के यामध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराकडून त्याच्या/तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. (१.)** आजपर्यंत, कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नाही, आणि/किंवा न्यायालयीन मनाई पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल यांचे अधिकृत अधिकारी, वरील स्थावर मालमत्ता/सुरक्षित मालमत्तेची विक्री, विल्हेवाट लावण्यापासून, आणि/किंवा विक्री करण्यापासून आणि स्थिती स्तंभ क्र. के यामध्ये नमूद केली आहे. **(२.)** संभाव्य खरेदीदार/बोलीवर आणि इच्छुक पक्ष स्वतंत्रपणे कार्यवाही/ऑर्डर इ. जर असेल तर, कॉलम क्र.-के यामध्ये नमूद केलेल्या बाजूची तपासणी करू शकतात, पीएनबीएचएफएल यांच्याकडे उपलब्ध असलेल्या शीर्षकाच्या दस्तऐवजांच्या शीर्षकासह परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्याआधी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्या. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(३.)** कृपया लक्षात घ्या की, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(३) नुसार, बोली लावणारा/खरेदीदार कायदेशीररीत्या विक्री किमतीच्या २५% रक्कम जमा करण्यास बांधील आहे, (इसारा ठेव अनामतसह, जर असेल तर, जमा) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या नंतर नाही. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(२) नुसार सुरक्षित धनकोकडून विक्री किमतीच्या २५% रक्कम मिळाल्यानंतरच विक्रीची पुष्टी बोलीदाराच्या नावे केली जाऊ शकते. विक्रीच्या मोबदल्याच्या उर्वरित ७५% रक्कम खरेदीदाराने विक्री पुष्टीकरण पत्राच्या पोचपावती तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे आणि अशा ठेवी न दिल्यास, मालमत्ता/सुरक्षित मालमत्ता पुन्हा विकली जाईल. **(४.) मे. मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारे विक्री आयोजित करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याला मदत करेल जिचे प्लॉट नं.६८, ३ रा मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा १२२००३ येथे कॉर्पोरेट कार्यालय आहे, वेबसाइट- www.bankeauctions.com. मालमत्तेची तपासणी किंवा बोली कागदपत्र मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, तुम्हाला गणेश अंकुश/नीलाक्षी पाटील यांच्याशी समन्वय साधावा लागेल टोल फ्री : १८०० १२० ८८००, ई-मेल : auction@pnbhousing.com, हे पीएनबीएचएफएलचा अधिकृत व्यक्ती आहे किंवा www.pnbhousing.com पहा.**

ठिकाण :- औरंगाबाद दिनांक :- ०९.०६.२०२५ **सही/- अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्रेडिट रिकव्हरी ॲण्ड लिगल सर्व्हिस डिपार्टमेंट
क्षेत्रिय कार्यालय : दि कॅपीटल बिल्डींग, पहिला मजला, कुलकर्णी गार्डन समोर, शरणपूर रोड, नाशिक-४२२००५. दूरध्वनी क्र.(०२५३)२३१७७७१

विक्री सुचना
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी

सिक्युरिटी इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) रूल्स,२००२ चे नियम ८(६)/नियम ९(१) सह वाचले जाणारे दि. सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, नुसार अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.

तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व जामिनदार यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, सिक्युअर्ड क्रेडिटर म्हणजेच **युनियन बँक ऑफ इंडिया** यांचेकडे संरक्षीत तारण/बोजा असलेली खालील नमुद अचल मालमत्ता ज्याचा **प्रतिकात्मक /प्रत्यक्ष ताबा युनियन बँक ऑफ इंडिया** अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे, सदरील मालमत्ता खाली दिल्यानुसार **'जशी आहे तशी' 'जी काय आहे ती'** आणि **'जी काय तेथे आहे ती'** या तत्त्वावर **युनियन बँक ऑफ इंडिया** सिक्युअर्ड क्रेडिटर्स खालीलप्रमाणे व्याजासह वसुलीसाठी **युनियन बँक ऑफ इंडिया यांनी गुरूवार, दि. २६.०६.२०२५ रोजी विक्रीस काढलेली** आहे. मालमत्तेचा तपशील, राखीव किंमत, अनामत ठेव रक्कम, खालीलप्रमाणे आहे.

शाखा	कर्जदार, सह-अर्जदार/जामिनदाराचे नाव	विक्रीसाठी काढलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशिल	राखीव किंमत / अनामत ठेव रक्कम / ताबा प्रकार	थकबाकी रक्कम
पंचवटी शाखा जि.नाशिक	कर्जदार- **श्री. अनिल रामभाऊ कुसाळकर व सौ. शांताबाई अनिल कुसाळकर**	फ्लॅट नं.१०, क्षेत्र मोजमापीत ६१६.४६ स्के.फु. म्हणजेच ५७.२९ स्के.मी. तीसरा मजला, इमारत ''साई वंदन अपार्टमेंट''नावाने प्लॉट नं. १७ वर बांधीव क्षेत्र मोजमापीत ३६२.९० स्के.मी. मधील सर्व्हे नं. ३२/११+१२/२+ टी.डी.आर. क्षेत्र मोजमापीत १४५.०० स्के.मी. मखमलाबाद, ता. व जि. नाशिक येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल नाशिक महानगरपालिका हद्दीत. **चतु:सिमा पुढीलप्रमाणे - प्लॉट नं. १७ च्या पुर्वेस:** ७.५० मी. कॉलनी रोड, **पश्चिमेस:** प्लॉट नं.१६, **दक्षिणेस:** सर्व्हे नं. लगत, **उत्तरेस:** ७.५० मी. कॉलनी रोड **फ्लॅट नं. १० च्या चतु:सिमा- पुर्वेस:** फ्लॅट नं.१३ व जिना, **पश्चिमेस:** ओपन स्पेस, **दक्षिणेस:** फ्लॅट नं. ११, **उत्तरेस:** ओपन स्पेस	राखीव किंमत **Rs. 15,35,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 1,53,500/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 9,71,215.36** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
पंचवटी शाखा जि.नाशिक	कर्जदार- **श्री. अनिल रामभाऊ कुसाळकर** व जामिनदार- **श्री. गिरीष वसंतराव कांगणे**	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे न्याय्य तारण- स.नं.३२/११+१२/२ बेअरींग प्लॉट नं. २८ मोजमापीत २०२.६८ स्के.मी. गाव मखमलाबाद, ता. व जि.नाशिक येथील स्थित एकत्रित बांधीव बंगला व स्थावर मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. **चतु:सिमा पुढीलप्रमाणे - पुर्वेस:** कॉलनी रोड, **पश्चिमेस:** ओपन स्पेस, **दक्षिणेस:** कॉलनी रोड, **उत्तरेस:** प्लॉट नं.२७	राखीव किंमत **Rs. 63,80,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 6,38,000/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 63,43,816.64** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
पंचवटी शाखा जि.नाशिक	कर्जदार- **मे. एस ॲण्ड एस कन्स्ट्रक्शन्स** प्रोप्रा- **श्री. अनिल रामभाऊ कुसाळकर** जामिनदार- **श्री. गिरीष वसंतराव कांगणे**	खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे न्याय्य तारण- सर्व्हे नं. २१०/ए+बी बेअरींग प्लॉट नं. २ ते २२/२७+२८+२९ क्षेत्र मोजमापीत ५२०.०९ स्के.मी. मौजे म्हसरूळ, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीतील स्थित मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. **चतु:सिमा पुढीलप्रमाणे - पुर्वेस:** ७.५० मी. कॉलनी रोड, **पश्चिमेस:** सर्व्हे नं.२०९, **दक्षिणेस:** ७.५० मी. कॉलनी रोड, **उत्तरेस:** प्लॉट नं.२६ वरील संदर्भित मालमत्तेवर बांधीव इमारत ''सन व्ह्यू अपार्टमेंट'', तळमजला, फ्लॅट नं. ०१, बिल्टअप क्षेत्र १०४५.०० स्के.फु. म्हणजेच ९७.११ स्के.मी म्हणजेच कार्पेट क्षेत्र ७४.७० स्के.मी. + गार्डन क्षेत्र १६.२६ स्के.मी. तळमजला मौजे म्हसरूळ, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीतील स्थित मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. **चतु:सिमा पुढीलप्रमाणे - पुर्वेस:** फ्लॅट नं. २ व जिना, **पश्चिमेस:** कंपाउण्ड भिंत, **दक्षिणेस:** बिल्डिंग पार्किंग, **उत्तरेस:** कंपाउण्ड भिंत वरील बांधलेल्या/बांधकाम सुरू असलेल्या इमारतीसह सांगितलेला प्लॉट आणि त्याचे सर्व कुंपण, गेट, कलव्हर्ट, इलेक्ट्रिक कनेक्शन, सदर इमारतीतील पाण्याचे कनेक्शन आणि फर्निचर व फिक्सचरसह.	राखीव किंमत **Rs. 31,00,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 3,10,000/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 47,88,681.19** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
दिपाली नगर शाखा जि.नासिक	कर्जदार: **राजू रंजन** जामिनदार: **श्री. कृष्णा जगन्नाथ पंडीत**	गौरंग अपार्टमेंट, संदीप किराणा स्टोअरजवळ, प्लॉट नं. ८, स.नं. १३२/३, कार्बन नाक्याजवळ, शिवाजी नगर, नाशिक-४२२०१२ येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. बिल्टअप क्षेत्र २०.३० स्क्रे.मी. **चतु:सिमा: उत्तरेस-** प्लॉट नं.५, **दक्षिणेस-** अनिता पवार यांच्या लगतचा परिसर, **पुर्वेस-** प्लॉट नं.७, **पश्चिमेस-** प्लॉट नं.८ (उषादेवी पंडीत क्षेत्र व प्लॉट नं.९)	राखीव किंमत **Rs. 5,00,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 50,000/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 10,34,790.78** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
अंबड शाखा जि.नासिक	कर्जदार: **सौ. जयश्री नारायण गायकवाड** जामिनदार: **श्री. संजय बाबुलाल महाजन**	जमिनीचा सर्व भाग व पार्सल फ्लॅट नं. १०, तिसरा मजला, ए विंग, श्री श्रीनिवास अपार्टमेंट, आयटीआय कॉलनी, श्रमिक नगर, शिवाजी नगर, सातपुर लिंक रोड, नाशिक-७. बिल्टअप क्षेत्र मोजमापीत ४७.८६ स्के. मी. बांधीव प्लॉट नं. १७० व १७१ एकुण क्षेत्र ६९७.०३ स्के.मी. मधील सर्व्हे नं. १९४/ए+टीडीआर क्षेत्र मोजमापीत २१८ स्के.मी.+६२ स्के.मी. **प्लॉट नं. १७० च्या चतु:सिमा- पुर्वेस-** प्लॉट नं. १५७, **पश्चिमेस-** कॉलनी रोड, **दक्षिणेस-** कॉलनी रोड, **उत्तरेस:** प्लॉट नं. १७१ **प्लॉट नं. १७१ च्या चतु:सिमा- पुर्वेस-** प्लॉट नं. १५६, **पश्चिमेस-** कॉलनी रोड, **दक्षिणेस-** प्लॉट नं. १७०, **उत्तरेस:** प्लॉट नं. १७२ **फ्लॅट नं. १० च्या चतु:सिमा- पुर्वेस-** मोकळे आकाश, **पश्चिमेस-** लिफ्ट, डक्ट फ्लॅट नं. ११, **दक्षिणेस-** बी विंग, **उत्तरेस:** जिना	राखीव किंमत **Rs. 11,50,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 1,15,000/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 14,73,433.88** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
गोविंद नगर शाखा जि.नासिक	कर्जदार: **१. श्री. मधुकर लक्ष्मण गाडे २. सौ. संगिता मधुकर गाडे**	फ्लॅट नं.१९, क्षेत्र मोजमापीत ६२७ स्के.फु., म्हणजेच ५८.२७ स्के.मी. बिल्टअप क्षेत्र, कार्पेट क्षेत्र ४३.८६ स्के.मी. तिसरा मजला, बिल्डिंग आकाश अपार्टमेंट नावाने बांधीव प्लॉट नं.५३ व ५४, एकुण क्षेत्र मोजमापीत ५६८.८० स्के.मी. मधील गट नं. १९१/२ए, मौजे पिंपळगाव बहुला शिवार, वॉटर टँकजवळ, श्रमिक नगर, सातपुर-अंबड लिंकरोड, सातपुर, नाशिक. येथील मालमत्तेचा सर्व भाग व पार्सल. **चतु:सिमा: पुर्वेस-** फ्लॅट नं. १६, **पश्चिमेस-** गट नं. १९१/१, **उत्तरेस-** फ्लॅट नं. २०, **दक्षिणेस-** फ्लॅट नं.१८	राखीव किंमत **Rs. 13,60,000/-** अनामत ठेव रक्कम **Rs. 1,36,000/-** प्रतिकात्मक ताबा	**Rs. 15,41,270.68** दि.३१.०५.२०२५ रोजी पुढील व्याज, खर्च आणि खर्चासह
कुडाशी शाखा जि.धुळे	कर्जदार: **श्री. सुनिल दलिचंद गोगड**	खाली वर्णन केलेल्या स्थावर